| MHAH060011302023 | **<u>फौजदारी चौकशी अर्ज २५७ / २०२३ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र.२६ खालील आदेश.</u>**<br>**<u>चैताली प्रविण कु–हाडे वि. प्रविण महादेव कु–हाडे +५</u>** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज दि. २१.०६.२०२५ रोजी नि.क्र.१ वर सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत सामनेवाला क्र. १ ते ३ व ५ व ६ यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी सामनेवाला क्र. १ ते ३ व ५ व ६ यांना महत्वाचे कागदपत्र काढुन न्यायालयात हजर होवून म्हणणे देणे शक्य झाले नाही तसेच सामनेवाले पैकी जेष्ठ व्यक्ती आजारी असल्यामुळे हजर रहाता आले नाही. दिनांक २१.०६.२०२५ रोजी सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश पारीत झाला असुन सदर आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी सामनेवाला यांनी विनंती केली आहे.

**<u>अर्जदाराचे म्हणणे –</u>**

३. अर्जदाराने निशाणी २६ वर सदर अर्जास आक्षेप घेतला घेवून, अर्जदाराने असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही तसेच खोटा असल्याने रद्द होणेस पात्र आहे. सदर अर्जावर संयुक्तीक कारण टाकलेले नाही असे त्यांनी म्हटले आहे.

४. अर्जदाराने तीचा व दोन साक्षीदारांचा पुरावा दिलेला आहे. अर्जदार न्यायहक्कापासुन व पोटगीपासुन वंचित रहावी तसेच अर्जदाराला कोणताही रिलीफ न मिळता तिचे मानसिक खच्चीकरण व्हावे म्हणुन सदर केस निकालास ठेवली असता सदरचा अर्ज सामनेवाला यांनी दाखल केलेला आहे.

५. सामनेवाला क्र. १ याने कौटुंबीक न्यायालय अहमदनगर येथे एच.एम.पी ३६९/२२ दाखल केला असुन त्यात सदर प्रकरणाचा उल्लेख केला असल्याने सामनेवाला यास सदर प्रकरणाविषयी माहिती नव्हती हे म्हणणे चुकीचे होईल असे

अर्जदाराने म्हटले आहे. तसेच अनेकदा पोलिसांमार्फत अर्ज नमुद पत्यावर समन्स पाठविण्यात आलेले आहेत. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींना कॉस्ट करण्यात यावी.

**६.** दोन्ही पक्षांचे विरुध्द कथने वाचले असता खालीलप्रमाणे विचाराधीन प्रश्न उपस्थीत होत असून त्याबाबतीत निष्कर्ष चर्चेसह खालीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. २१.०६.२०२५ रोजी नि.क्र.१ वर सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करण्यात यावा का ? | हो. |
| २. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**७.** अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदाराचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**८.** प्रस्तुत काम सुध्दा बारकाईने पाहिले. प्रस्तुत प्रकरण महिलांचा घरगुती जुलूमापासून संरक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ चे कलम १२,१८,१९,२०,२२,२३ अन्वये दाखल केलेला आहे. सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ या कामी हजर झाले नाही त्यामुळे सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ विरुध्द दिनांक २१.०६.२०२५ रोजी निशाणी क्र.१ वर त्यांच्या विरुध्द 'एकतर्फा' असा आदेश पारीत करण्यात आला होता. आता सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ सदर आदेश रद्द करु इच्छितात.

**९.** प्रस्तुत प्रकरणात घरगुती हिंसाचारा संदर्भात विरुध्द कथने आहेत त्यामुळे दोन्ही बाजुंचे कथने समोर आल्यास वादांकीत प्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल.

सामनेवाला क्र. १ ते ३ व ५ व ६ यांचे अर्जातील कथनांमध्ये अतिशियोक्ती वाटत नाही. जर अशी संधी सामनेवाला १ ते ३ व ५ व ६ यांना दिली तर त्यामुळे अर्जदाराचे कोणतेही अपरिमित किंवा खूप नुकसान होण्याचे शक्यता वाटत नाही. प्रस्तुत अर्ज मंजुर करताना काही खर्च सामनेवाला यांच्यावर लादण्यात येत आहे. त्यामुळे, विचाराधीन **प्रश्न क्र. १** याचे उत्तर होकारार्थी देत आहे. त्यामुळे, विचाराधीन प्रश्न क्र.२ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

**१.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**२.** सामनेवाला क्र. १ ते ३ व ५ व ६ विरुध्द दिनांक २१.०६.२०२५ रोजी झालेला निशाणी क्र.१ वर झालेला 'एकतर्फा ' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

**३.** सामनेवाला क्र.१ ते ३ व ५ व ६ यांनी अर्जदार यांना प्रत्येकी ५००/- रुपये अर्जाचा खर्च दयावा.

४. सामनेवाला यांनी पुढील तारखेस अर्जदाराचा उलटतपास घ्यावा.

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.09.12 10:43:43 +0530

**दिनांक –०८.०९.२०२५.** **(काटकर विजया एन.एस)**

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

श्रीरामपूर.